नीज माझं, सागर शयना,
बाळा जोजोरे.
नीज माझं, सुंदर वदना,
बाळा जोजोरे.
क्रिष्णा, बाळा जोजोरे.

गो रूप धरून आले शरणं
सोसूवन भारं (भार सोसून)
दैत्य उत्पत झाले आले
घेऊनी अवतारं
आले घेऊनी अवतारं

देवकी वासु देव तपसं,
केले हो नीटं.
यांच उदरी, आले हरी
घेवूनी अवतारं,
आले, घेवूनी अवतारं.

रोहिणी नक्षत्र, अष्टमी तिथी,
शंखु चक्र हाती,
अवतार केले, यदुपतीनी,
पुष्प वृष्टी करतील.
धन्ये, पुष्प वृष्टी करतील.

धन्य धन्य हो,
यमुना बाई उगुनी आली
शरण सेवा करूनी या
मागूनी वाट देली
हरुषी, मागूनी वाट देली

यशोदाच अंथरूणं,

निजवीले थानं, (स्तन, थान देणे = breast feeding)
सम झालं परतूनं,
दुर्गी घेवूनं,
आले, दुर्गी घेवूनं.

नीज माजं, सागर शयना,
बाळा जोजोरे.
नीज माझं, सुंदरा वदना,
बाळा जोजोरे.
क्रिष्णा, बाळा जोजोरे.